** जाहिरात * *

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर कार्यालयाच्या अंतर्गत घटक कार्यालयातील आस्थापनेवरील विधी अधिकारी 'गट-ब' व विधी अधिकारी यांची परिक्षेत्रातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

क्र. पशा-०४/संकिर्ण/कंत्राटी वि.अधिकारी/जाहीरात/ भरती/२०२६/ ७७१६ कोल्हापूर, दि:- १३.११.२०२६

मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल याचिका क्र. ९१४५/२०१० व ९१६०/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाविरूध्द मा. सर्वोच्य न्यायालयात दाखल केलेल्या विशेष हक्क याचिका (Civil) क्र. १९००८-१९००९/२०१२ व विशेष हक्क याचिका (Civil) क्र. ३४७८८-३४७८९/२०१२ मध्ये मा. सर्वोच्य न्यायालयाने दिलेल्या अंतरिम सदरची पदे भरावयाची असून त्याद्वारे होणाऱ्या नेमणुका मा.सर्वोच्य न्यायालयात न्याय प्रविष्ट असलेल्या उक्त विशेष हक्क याचिकेच्या अंतरिम निर्णयाच्या अधिन राहून असतील.

कंत्राटी विधी संवर्ग (एकूण १७ पदे)

महाराष्ट शासन निर्णय गह विभाग क्रमांक अेपीओ-३१०६/प्र.क्र२२७/पोल-३ दि.२१.०८.२००६ व शासन निर्णय विभाग एसपीपी २००५/ प्रक्र २४७/ पोल १० दि. १५.०९.२००६अन्वये तसेच पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र दि.०२.११.२००६ नुसार विशेष पोलीस महानिरिक्षक, कोल्हापूर परिक्षेत्रातंर्गत घटक कार्यालयाकडील जिल्हयामध्ये दर्शविल्याप्रमाणे त्या ठिकाणी विधी अधिकारी 'गट-ब' व विधी अधिकारी पदे मंजूर असून सदर पदे ११ महिन्याकरिता कंत्राटी पध्दतीनुसार भरावयाची आहेत.

अ.क्र.	जिल्हा	विधी अधिकारी - गट ब रिक्त जागा	विधी अधिकारी रिक्त जागा	एकुण पदे
१.	कोल्हापूर	०	१	१
२.	सांगली	०	१	१
३.	सातारा	०	१	१
४.	सोलापूर ग्रामीण	०१	४	५
५.	पुणे ग्रामीण	०	७	७
	एकूण	**०१**	**१४**	**१५**

इच्छुक उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहीत नमून्यातील अर्ज लिफाफ्यात घालून लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात **"विधी अधिकारी 'गट-ब'/ विधी अधिकारी या पदासाठी अर्ज"** असे स्पष्ट नमूद करून दोन रंगीत फोटो अर्जासोबत जोडून ते अर्ज दि. ३०.११.२०२६ रोजी सायं. ०५.४५ वा. पर्यंत **पोलीस अधीक्षक कार्यालय, रमणमळा, कसबा बावडा कोल्हापूर -४१६००३** या पत्त्यावर पोहचतील अशा बेताने पाठवावेत. **अर्हता प्राप्त उमेदवारांनी त्यांना वर नमूद दोन्ही पदांसाठी अर्ज करावयाचे असल्यास ते स्वतंत्रपणे सादर करावेत. दि.३०/११/२०२६ नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.** उमेदवारांनी पत्रव्यवहाराकरीता अर्जासोबत स्वत:चे संपूर्ण नाव व पत्ता लिहीलेले दोन लिफाफे जोडावेत, तसेच अर्जात त्यांचा दूरध्वनी, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी यांचा स्पष्टपणे उल्लेख करावा.

* **टिप :-** वर दर्शविलेल्या पदसंख्येत बदल करणेचे अधिकार हे सक्षम प्राधिकारी विशेष पोलीस महानिरिक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांना राहतील. तसेच सदरची जाहिरात पोलीस अधीक्षक कोल्हापूर कार्यालयाच्या https//kolhapurpolice.gov.in या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

करारातील मासिक देय रक्कम :-

अ.क्र.	पदाचे नाव	करारातील मासिक देयक रक्कम
१	विधी अधिकारी 'गट-ब' पदाकरिता करारातील मासिक देय रक्कम	रू.२५,०००/- + दुरध्वनी व प्रवास खर्च रू.३,०००/- असे एकूण रू.२८,०००/- दरमहा देय राहतील इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.
२	विधी अधिकारी पदाकरिता करारातील मासिक देय रक्कम	२००००/- + दुरध्वनी व प्रवास खर्च रू.३,०००/- असे एकूण रू.२३,०००/- दरमहा देय राहतील इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

शैक्षणिक अर्हता व अनुभव :

१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कायद्याचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल.
२) विधी अधिकारी, गट - ब व विधी अधिकारी या दोन्ही पदांसाठी वकिली व्यवसायाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.
३) उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबतीत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
४) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.
५) **उमेदवाराचे वय :**
   अ) विधी अधिकारी गट - ब व विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे दिनांकास ६० वर्षापेक्षा जास्त नसेल.

➢ **निवड प्रकिया :-**

संपूर्ण निवड प्रक्रिया ही ७५ गुणांची असेल त्याचे विवरण खालीलप्रमाणे....

अ) लेखी परिक्षा - ५० गुण, वेळ - १ तास

वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी (Objective Type) - ५० गुण

सेवा विषयक व फौजदारी स्वरूपाच्या प्रकरणांमध्ये, तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या प्रकरणांमध्ये तसेच भारतीय नागरिक सूरक्षा संहिता २०२३ कलम २९८ किंवा महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम १९९९ मधील प्रकरणांत अभियोग दाखल करण्याची परवानगी देण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यास सुलभ निर्णय घेता येईल अशा प्रकरणांची छाननी करण्याची क्षमता तपासणारे प्रश्न तसेच सध्याची न्यायिक स्थिती (Settlef Postion Of Law) काय आहे. तसेच भारतीय न्याय संहिता२०२३ बाबतच्या ज्ञानाचे आकलन करणाऱ्या प्रश्नांचा समावेश असेल.

भारतीय दंड सेहिता १८६० ,फैजदारी प्रक्रिया संहिता १९७५ भारतीय पूरावा कायदा, भारतीय साक्ष अधिनियम २०२३, भारतीय नागरिक सूरक्षा संहिता २०२३ फौजदारी न्यायनिवाडे किरकोळ कायदे पोलीस विभागाशी निगडीत सर्व कायदे महाराष्ट्र नागरी सेवा नियम ,विभागीय चौकशी संबधित न्यायनिवाडे इत्यादी प्रश्नांचा समावेश असेल.

ब) मुलाखत - २५ गुण.

क लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारापैकी एकून पदांच्या (विधी अधिकारी गट-ब ०१ पदे व विधी अधिकारी १४ अशी एकुण १५ पदे) तीन पट उमेदवार लेखी परिक्षेतील मेरीटनूसार मूलाखतीसाठी पात्र ठरतील. लेखी परिक्षेचा व मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल लेखी परिक्षेत व तोंडी परिक्षेत प्राप्त गूण एकत्रित करून एकून गूणानूक्रमानूसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात येईल .

क) नियूक्ती देणेसाठी उमेदवारास कमीत कमी ६० टकके गुण असणे आवश्यक आहे.

➢ **कर्तव्य व जबाबदाऱ्या :-**

१. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२. सेवाविषयक / प्रशासकिय बाबी / विभागीय चौकशा तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतीज्ञापत्रे संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.

४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊ न न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करून तो संबंधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

८. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

९. कायदा सेवा व प्रशासनासंबधी इतर अनुषंगीक कामे करणे

१०. लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा प्रकरणात किंवा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता मधील कलम २१८ किवा महाराष्ट्र संघटित गून्हेगारी अधिनियम १९९९ मध्ये मंजूर मधील प्रकरणात अभियोग दाखल करण्याची परवानगी देण्यासाठी संबधित सक्षम प्राधिका-यांना अभियोग दाखल करण्याची परवानगी देणे किंवा न देणे याबाबत निर्णय घेणे.

११. उमेदवारांनी प्रत्येक आठवडयात किमान ३० तास काम करणे आवश्यक आहे.

<u>अटी व शर्ती</u>

१. उपरोक्त पदे भरण्याबाबत उक्त दि.२१.०८.२००६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ३ येथे करण्यात आलेल्या तरतुदीनुसार नियमीत वेतनश्रेणीत न भरता एकत्रीत वेतनावर कंत्राटी पध्दतीने भरण्यास खालील अटींच्या अधिन राहून शासनाने मान्यता दिली आहे.

२. सदर पदांची नेमणूक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल या अधिकारी / कर्मचाऱ्यांना शासकिय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

३. सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात याव्यात. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढवता येईल. तथापि, अशी मुदत वाढविताना एकावेळी हि मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही याची काळजी नियुक्ती प्राधिकारी घेईल. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च: नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च: निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

४. निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधीकाऱ्याच्या लेखी परवानगी शिवाय करू शकणार नाही. जर नियुक्ती प्राधीकाऱ्याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. लेखी परिक्षेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांमधून मुलाखतीद्वारे अंतिम निवड करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल. लेखी परिक्षेचा दिनांक, वेळ व ठिकाण तसेच निकाल, अंतिम निवड याबाबतची माहीती उमेदवारांना या कार्यालया कडून कळविण्यात येईल.

६. उमेदवारांना कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

७. नियुक्ती केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) करून देणे अनिवार्य राहिल. करारनामा करिता येणारा खर्च उमेदवारास स्वत: करावा लागेल.

८. करार पद्धतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

९. उमेदवारांनी वर विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दि. /११/२०२६ पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे.

१०. अर्जासोबत २.५ से.मी. X २.५ से.मी. आकाराचे सध्याचे काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

११. विधी अधिकारी 'गट-ब' व विधी अधिकारी भरतीसाठी करण्यात येणारा पत्रव्यवहार हा ई-मेल व मोबाईल द्वारे करण्यात येईल.

१२. उमेदवारांनी त्यांचे अर्ज (परिपूर्ण व व्यवस्थित भरलेल्या विहीत नमून्यातील, त्यांची स्वाक्षरी असलेला अर्ज) **पोलीस अधीक्षक कार्यालय, रमणमळा, कसबा बावडा कोल्हापूर -४१६००३.** या पत्त्यावर पोहचतील अशा बेताने पाठवावेत. **अर्हता प्राप्त उमेदवारांनी त्यांना वर नमूद दोन्ही पदांसाठी अर्ज करावयाचे असल्यास ते स्वतंत्रपणे सादर करावेत. दि. /११/२०२६ नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.** दिनांक /११/२०२६ रोजी सायं.०५:४५ वा. पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावेत, दिनांक. /११/२०२६ नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(नीलोत्पल, भा.पो.से.)
पोलीस अधीक्षक, कोल्हापूर

अर्जाचा नमूना

"विधी अधिकारी / विधी अधिकारी 'गट-ब" * पदाकरिता अर्ज

कार्यालयीन उपयोगासाठी

१. अर्ज क्रमांक : □□□□□□□

२. अर्ज स्विकारल्याचा दिनांक : □□ □□ □□□□

३. अर्ज स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह) : _____

एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा.

सूचना : अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

* आवश्यक नसेल तेथे खोडावे.

अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती :

१. **अर्जदाराचे संपूर्ण नांव :** आडनांव नांव वडीलांचे / पतीचे नांव
मराठीत

_____

इंग्रजीत

□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□□

२. **पत्रव्यवहाराचा पत्ता :**

_____

तालुका :_____ जिल्हा :_____ पिन कोड : □□□□□□

३. **कायमचा पत्ता :**

तालुका :_____ जिल्हा :_____ पिन कोड : □□□□□□

४. **दूरध्वनी क्रमांक :-** लॅन्डलाईन : _____ मोबाईल क्रमांक : _____

४. A. **ई - मेल :** _____

५. **जन्म दिनांक :** □□ □□ □□□□ **जन्म स्थळ :** _____
दिवस महिना वर्ष

६. **दिनांक ३०/०६/२०१६ रोजीचे वय :** □□ □□ □□□□ **(वयाच्या पुराव्याची एक प्रत सोबत जोडावी)**
दिवस महिना वर्ष

७. **लिंग :** पुरूष □ / महिला □

८. **धर्म :** _____ **जात:**_____

९. **महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ?** होय : □ / नाही : □

☼ **योग्य असेल त्या ठिकाणी (√) अशी खूण करावी.**

ब) अर्जदाराची शैक्षणिक माहीती :

१०. शैक्षणिक अर्हता :

अ.क्र.	शिक्षण	शैक्षणिक संस्थेचे नांव (विद्यालय/महाविद्यालय)	बोर्ड / विद्यापीठ	उत्तीर्ण झालेचा दिनांक	मिळालेले गुण	मिळालेली टक्केवारी
१.	माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१० वी) अथवा जुनी ११ वी परिक्षा					
२.	उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१२वी)					
३.	पदवी					
४.	विधी पदवी					

११. इतर शैक्षणिक अर्हता :

संगणक प्रशिक्षीत आहे काय ? होय : □ / नाही : □

१२. अर्जदाराची इतर माहिती

अ) सनद घेतल्याचा दिनांक

ब) उमेदवाराने स्वत: हाताळलेला केसेसचा तपशील :

अ. क्र.	न्यायालयाचे नांव	केसेसचा प्रकार	केसेसच्या संख्या
१.	२.	३.	४.

* **टिप :** वकीली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१३. अ. अर्जदारावर या पूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात / बध्द करण्यात / दंड करण्यात / सिध्दोषी ठरवण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या

होय : □

परीक्षांना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा

नाही : □

कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडून / संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय / काढून टाकण्यात आले आहे काय ?

१३.-ब. हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/

होय : □

संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ?

नाही : □

(१३- अ किंवा १३- ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्दती, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादींचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय / विद्यापीठ / शैक्षणिक प्राधिकरण इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.)

अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री. / सौ./ कु. _____ याद्वारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणिवपुर्वक तसेच विश्वासपुर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्या बाबतीत माझे विरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

दिनांक :
अर्जदाराची सही

(दिनांकासह)

सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.